**सरकारतर्फे सा.क्र.३**

**शपथेवर**

माझे नांव : पो. ना. संदीप संजय दरंदले,
वय : - धंदा : नोकरी,
सध्या नेमणुक : श्रीरामपुर शहर पोलिस ठाणे,
ता. श्रीरामपुर, जि.अहमदनगर.

**<u>सरतपास सरकार पक्षातर्फे विद्वान सरकारी वकिल श्रीमती एस. पी. औताडे यांचेमार्फत शपथेवर सुरू</u>** -

१. दि.२७/०३/२०१८ रोजी मी नेवासा पोलिस ठाणे येथे पो.कॉ. म्हणुन कार्यरत होतो. त्यावेळी मी, पो. हे. कॉ. गायकवाड, पो. ना. पवार, पो. ना. तोडमल, पो. कॉ. कचे असे पोलिस ठाण्यात हजर असताना पो.नि. लोखंडे यांना गुप्त बातमीदाराकडुन बातमी मिळाली की, बेलपिंपळगाव येथे बाजारतळावर आडोश्याला एक इसम देशी दारूची विक्री करत आहे. बातमीच्या अनुषंगाने आम्ही खाजगी वाहनाने घटनास्थळी गेलो. पो.हे.कॉ. गायकवाड यांनी दोन पंचांना बोलावुन घ ेतले व १८.०० वाजता छापा टाकला. तेथे एक इसम मिळुन आला. त्याला त्याचे नाव विचारले असता, सुखदेव सखाराम शेंडगे, रा. बेलपिंपळगाव असे सांगितले. त्याच्या ताब्यातुन देशी दारू बॉबी संत्रा कंपनीच्या एकुण १७ बॉटल र.रू. ८८४ चा मुद्देमाल मिळुन आला. पो.हे.कॉ. यांनी मुद्देमाल जप्त करून पंचनामा केला. आम्ही आरोपींना घेवुन पोलिस ठाण्यात आलो व फिर्याद दाखल केली. आता मला फिर्याद दाखविण्यात आली. ही तिच फिर्याद आहे व त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. फिर्यादीस **निशाणी १८** देण्यात येते. आरोपीला पाहिल्यास मी ओळखू शकतो. आजरोजी आरोपी न्यायालयात हजर नाही. **(निशाणी १६ वर आरोपीचा गैरहजेरी माफीचा अर्ज दाखल. ओळख आव्हानित न करण्याच्या अटीवर अर्ज मंजुर करण्यात आला.)**

**सरतपास पुर्ण.**

**<u>आरोपीतर्फे विद्वान वकिल श्री. पी. सी. नहार यांचेमार्फत उलटतपास सुरू-</u>**

२. ज्या खाजगी वाहनाने आम्ही घटनास्थळी गेलो त्या वाहनाचा नंबर मला

सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या आजुबाजुला लोकवस्ती आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही घटनास्थळी गेलो नाही व कोणतीही कारवाई केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, केवळ वरिष्ठांच्या सांगण्यावरून केसेसचा कोठा पुर्ण करण्यासाठी आरोपीविरुद्ध खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृती**
स्वाक्षरीत/-
**(लीना अ. काळे)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.४,नेवासा

दि. ०८/०९/२०२५